प.क्र. २०१५/ क्षे.कर्मचारी/जशिअ/
जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
दि.१८.०४.२०१५

प्रति,

१) तहसीलदार, --------------(सर्व),
२) गट विकास अधिकारी --------------------(सर्व)
३) तालुका कृषि अधिकारी -------------------(सर्व)

**विषयः जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत गावपातळीवर ग्रामसेवक, तलाठी व कृषि सहाय्यक यांचा कार्यक्षम वापर करणेबाबत.**

जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत विविध गावांना देण्यात आलेल्या भेटी व ग्रामसभांचे वृत्तांताचे निरीक्षण केले असता असे निदर्शनास आले की, ज्या गावात ग्रामसेवक, तलाठी व कृषि सहाय्यक यांनी एकत्रीतपणे समन्वयाने काम केले तेथे मोठ्या प्रमाणात लोकसहभाग व कामे होत आहेत. परंतू, ज्या ठिकाणी ग्रामसेवक, तलाठी व कृषि सहाय्यक कामाबाबत उदासीन आहेत, मुख्यालयी राहात नाहीत, समन्वय नाही, तेथे जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत अद्यापही कामे सुरु होऊ शकली नाहीत. सदर बाबीची नोंद आपण गांभीर्याने घ्यावी.

कृषि विभागाने जलसंधारण व पाणलोट कामांसाठी नरेगा योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यता घेवूनही अद्याप कामे सुरु होऊ शकली नाहीत, अशा ठिकाणी, ग्रामसेवक, तलाठी व कृषि सहाय्यक यांनी पुढाकार घेवून, मजूर उपलब्ध करुन द्यावे व त्यांच्या समस्यांचे निरसन करणे आवश्यक आहे.

माझ्या असे निदर्शनास आले आहे की, दि.७, ९ व १० एप्रील २०१५ रोजी झालेल्या ग्रामसभेत काही ठिकाणी ग्रामसेवक, तलाठी व कृषि सहाय्यक यांची नावापुरती उपस्थिती होती. करिता आपणास निर्देशीत करण्यात येते की, जे अधिकारी / कर्मचारी सदर योजनेमध्ये उदासीनता दर्शवत आहेत व जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत अशा अधिकारी / कर्मचारी यांचेविरुद्ध तात्काळ कार्यवाही करुन अहवाल माझ्याकडे सादर करावा.

**जिल्हाधिकारी, परभणी**

**प्रतिलीपीः**

1) **मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. परभणी**
2) **वरीष्ठ भुवैज्ञानिक, जी.एस.डी.ए., परभणी**
3) **उपविभागीय अधिकारी,----------------- (सर्व)**

**जिल्हाधिकारी, परभणी**